# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः15.03.2024** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून कर्नाटकसह विविध राज्यांच्या दौऱ्यावर
2. ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू देशाचे नवे निवडणूक आयुक्त
3. पुणे ईसीस मोडयूल प्रकरणी एनआयएकडून आणखी चार जणांवर आरोपपत्र दाखल
4. रशियाच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मतदानाला प्रारंभ आणि
5. 14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र उपांत्यपूर्व फेरीत

**<u>पंतप्रधान दक्षिण दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांच्या 5 दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. तामिळनाडूतील कन्याकुमारीमधून या दौऱ्याची सुरुवात होत आहे. आज सकाळी विवेकानंद महाविद्यालयाच्या मैदानावर ते जाहीर सभेला संबोधित करतील. त्यानंतर केरळमधील 2 लोकसभा मतदारसंघांना भेट देऊन निवडणूक प्रचारात ते सहभागी होतील. ते आज कर्नाटकातील कलबुर्गी इथं तर 18 मार्चला शिवमोगा इथं जाणार आहेत. 2 दिवसांनी ते सालेम आणि कोईंबतूरला देखील भेट देणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते तेलंगणातील विविध जिल्ह्यांना तसंच लोकसभा मतदारसंघांनाही भेट देणार आहेत.

**<u>मुर्मू</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी हैदराबाद इथं जागतिक अध्यात्म महोत्सवाचं उद्घाटन करणार आहेत. हैदराबादमधल्या कान्हा शांती वनम इथं रविवारपर्यंत हा आध्यात्मिक महोत्सव चालणार आहे. यानिमित्तानं जगातील सर्वात मोठ्या ध्यान केंद्रात सर्व धर्मांच्या आध्यात्मिक गुरूंना एका व्यासपीठावर आणलं जात आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय श्रीराम चंद्र मिशन आणि इतरांच्या समन्वयानं या कार्यक्रमाचं आयोजन करत आहे. 'आत्मिक शांती ते जागतिक शांती' ही या महोत्सवाची मुख्य संकल्पना आहे. धर्म, अध्यात्म आणि याची मनुष्याला होणारी मदत अशा विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी देशभरातून आणि जगभरातून 300 हून अधिक तज्ञ यासाठी एकत्र येत आहेत. या कार्यक्रमाला सुमारे एक लाख लोकं उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**<u>नियुक्ती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी माजी सनदी अधिकारी ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची देशाचे नवे निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक केली आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयानं यासंदर्भात आदेश जारी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेतले काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी यांचा समावेश असलेल्या समितीनं या दोघांच्या नावांची शिफारस राष्ट्रपतींना केली होती. राजीव कुमार सध्या मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून

कार्यरत आहेत. अरुण गोयल यांनी राजीनामा दिल्यानं तसंच अनुपचंद्र पांडे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानं ही पदं रिक्त होती.

**<u>आयोग</u>**

निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांची माहिती त्यांच्या www.eci.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्टेट बँकेनं परवा आयोगाला ही माहिती दिली होती.

**<u>एक देश एक निवडणूक</u>**

एक देश एक निवडणूक या विषयावर अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारनं स्थापन केलेल्या समितीनं आपला अहवाल काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सुपूर्द केला. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील या समितीनं तयार केलेला हा अहवाल 18 हजार 626 पानांचा आहे. गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यावेळी उपस्थित होते. देशात सर्व निवडणुका एकाच वेळी घेण्याची प्रक्रिया दोन टप्प्यांत राबवण्याची शिफारस या समितीनं केली आहे. पहिल्या टप्प्यात संपूर्ण देशात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेतल्या जाव्यात. आणि दुसऱ्या टप्प्यात नगरपालिका, नगर परिषदा, महानगरपालिका, पचायत समित्यांच्या निवडणुका घेतल्या जाव्यात. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांनंतर 100 दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची शिफारस या समितीनं केली आहे.

**<u>स्वनिधी</u>**

प्रधानमंत्री स्वनिधी योजना फेरीवाल्यांसाठी एक महत्त्वपूर्ण साधन ठरत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांनी काल दिल्लीत स्वनिधी योजनेअंतर्गत 1 लाख लाभा लाभार्थ्यांना कर्जाचं वाटप केलं; तसंच योजनेच्या लाभार्थ्यांना संबोधितही केलं. कोरोना काळात लोकांनी रस्त्यावरच्या विक्रेत्यांची ताकद पाहिली असल्याचं पंतप्रधान म्हणाले. रस्त्यावरचे विक्रेते आणि रस्त्यालगतच्या दुकानदारांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं.

**<u>शहा</u>**

राष्ट्रीय तपास संस्थेने तयार केलेल्या अत्याधुनिक व्यवस्थापन यंत्रणेचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल दूरस्थ पद्धतीनं झालं. दहशतवाद आणि संघटित गुन्हेगारीविरोधातील कारवाईला चालना देण्याच्या दृष्टीन ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याचबरोबर जम्मू आणि कोची इथल्या राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या दोन नवीन शाखा कार्यालयांचं आणि रायपूरमधील निवासी संकुलाचं उद्घाटनही शहा यांनी केलं. राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेनं तयार केलेल्या संकलन या मोबाईल ॲपचं लोकार्पण देखील शहा यांच्या हस्ते झालं. राज्याच्या पोलीस महासंचालकांनी प्रभावी आणि गतिशील तपास तसंच कारवाई करण्यासाठी नवीन युगातील सोफ्टवेअरचा वापर करण्याचं आवाहन शहा यांनी यावेळी केलं.

**<u>NIA</u>**

पुणे ईसीस मोडयूल प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेने काल आणखी चार जणांवर काल आरोपपत्र दाखल केलं. या पुरवणी आरोपपत्रात मोहम्मद शहनावाज आलम, रिजवान अली, अब्दुल्ला शेख आणि तल्हा लियाकत

खान यांची नावं समाविष्ट करण्यात आली आहेत, तर शमिल नाचन याच्यावर अतिरिक्त आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी एनआयएने आतापर्यंत 11 जणांवर आरोपपत्र दाखल केलं आहे. पुण्यासह अन्य ठिकाणी स्फोट घडवून आणण्याच्या कटात त्यांचा सहभाग असल्याचं एनआयएच्या तपासात समोर आलं आहे.

**<u>रशिया</u>**

रशियाच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आजपासून 3 दिवस मतदान होणार आहे. प्रारंभीक मतदान आणि टपाल मतदान आधीच सुरु झालं आहे तसंच ऑनलाईन मतदानाचा पर्याय रशिया प्रथमच या निवडणुकीमध्ये वापरणार आहे. व्लादिमीर पुतिन, निकोलाई खारिटोनोव्ह, लिओनिद स्लुटस्की आणि व्लादिस्लाव दावांकोव हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. व्लादिमीर पुतिन पाचव्यांदा राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले तर, त्यांनी 2020 मध्ये केलेल्या घटनात्मक बदलांमुळे 2036 पर्यंत ते सत्तेत राहतील. त्यामुळे ही निवडणूक फक्त रशियासाठीच नाही तर संपूर्ण जगासाठीही महत्त्वपूर्ण असणार आहे.

**<u>रशिया फ्रांस</u>**

रशिया-युक्रेन संघर्षाला तीन वर्ष होत आहेत; त्या पार्श्वभूमीवर, युरोपीय देशांनी युद्धासाठी तयार राहिले पाहिजे असं फ्रांसचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी म्हटलं आहे. युरोपला शांतता हवी असेल तर रशियाला एक शत्रू राष्ट्र म्हणून पाहिले पाहिजे, असेही ते म्हणाले. रशियाला उत्तर नं देणं म्हणजे पराभव स्वीकारण्यासारखंच आहे असं ते म्हणाले. मात्र, फ्रान्स कधीही रशियावर हल्ला करणार नाही, असेही मॅक्रॉन यांनी नमूद केलं.

**<u>पेट्रोल</u>**

तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात देशभरात प्रतिलिटर 2 रुपयांनी कपात केली आहे. नवे दर आज सकाळी 6 पासून लागू झाले आहेत. त्यामुळे मुंबईत आता पेट्रोल 104 रुपये 21 पैसे तर डिझेलची किंमत 92 रुपये 15 पैसे असेल.

**<u>हॉकी</u>**

पिंपरीतल्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर सुरू असलेल्या 14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत घरच्याच मैदानावर खेळणाऱ्या महाराष्ट्र हॉकी संघाचा आत्मविश्वास उंचावला असून काल त्यांनी बलाढ्य दिल्ली संघावर 3-0 असा दणदणीत विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आंतरराष्ट्रीय हॉकीपटू ऋतुजा पिसाळ तसेच काजल अडपतकर आणि प्रियांका वानखेडे या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. गतविजेत्या मध्य प्रदेश संघाने सलग विजय नोंदवत उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान पक्के केले. याशिवाय झारखंड, बंगाल आणि मणिपूर या संघांनीही काल विजय नोंदवले.

**<u>बॅडमिंटन</u>**

इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेनने अंडर्स अंटोंसेनवर दणदणीत विजय मिळवून उपांत्यपूर्वफेरीत प्रवेश केला आहे. लक्ष्य सेनने अंटोंसेनवर 24-22, 11-21, 21-14 अशी मात केली. भारताच्या पी.व्ही. सिंधूला मात्र महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत पराभव पत्करावा लागला. पुरुष दुहेरीत चिराग शेट्टी आणि सत्विकसाईराज रांकीरेड्डी या जोडीला इंडोनेशियाच्या बी मौलाना आणि एम एस फिक्री

यांच्याकडून हार पत्करावी लागली. महिला दुहेरीतसुद्धा अश्विनी पोनाप्पा आणि तनिषा क्रिस्टो यांना पराभव पत्करावा लागला आहे.

**रणजी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात काल मुंबई संघानं विदर्भ संघाचा 169 धावांनी पराभव करत रणजीमधला 42 वा विजय नोंदवला. मुंबईच्या दुसऱ्या डावातल्या 538 धावांच्या प्रत्युत्तरात, विदर्भानं कडवी झुंज दिली; मात्र त्यांना 368 धावा करता आल्या. दुसऱ्या डावात शानदार शतक झळकावणारा मुंबईचा मुशीर खान सामनावीर ठरला असून, संपूर्ण स्पर्धेत उत्तम कामगिरी करणारा तनुष कोटियन मालिकावीर ठरला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.